# ड्रिपटेकची वाजवी खर्चातील ठिबक सिंचन यंत्रणा आता भारतात

मुंबई, दि. १७ - ड्रिपटेक इंक (ड्रिपटेक) या कंपनीने आपल्या अल्पखर्चिक अशा ठिबक सिंचन यंत्रणेच्या किरकोळ विक्रीला भारतात सुरुवात केली आहे. या कंपनीने कर्नाटक, झारखंड आणि तमिळनाडू येथे ड्रिपटेकने आपली सिंचन यंत्रणा बसवली असून या भागातील विक्रीला चांगले यश मिळाले आहे.

ड्रिपटेक ही कंपनी आता आपल्या वाजवी खर्चातील सिंचन यंत्रणांची किरकोळ विक्री महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये गोदरेज अॅग्रोव्हेटच्या वितरकांच्या माध्यमातून करणार आहे. या विक्रीला गेल्या महिन्यात हुबळी येथे सुरुवात झाली. या महिन्यात नाशिक, औरंगाबाद आणि सांगली येथे विक्रीला प्रारंभ करण्यात येणार आहे.

ड्रिपटेकचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर फ्रिकमन यांनी सांगितले की, गोदरेज अॅग्रोव्हेटच्या वितरकांच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील शेतकऱ्यांपर्यंत पोहचत असल्याचा आम्हाला आनंद होत आहे. गोदरेज हा देशातील एक नावाजलेला ब्रँड असून ही कंपनी शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत वाढ होण्याच्यादृष्टीने त्यांच्याबरोबर कार्यरत आहे.

गोदरेज अॅग्रोव्हेटचे व्यवस्थापकीय संचालक बलराम यादव यांनी सांगितले की, अन्न सुरक्षेत सुधारणा करणे, जलस्त्रोतांचे संरक्षण करणे आणि भारतीय शेतकऱ्यांना अधिक समृद्ध करण्यासाठी ठिबक सिंचनाला महत्त्व आहे. गोदरेज अॅग्रोव्हेटच्या धोरण आणि व्यवसाय विकास विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष मार्क कान म्हणाले, ठिबक सिंचन यंत्रणा आजही अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकलेली नाही. परंतु ड्रिपटेकची सूक्ष्म जलसिंचन यंत्रणा शेतकऱ्यांची ही गरज भागवत आहे.